रेशीम शेती विकास
जिल्हास्तरीय योजनेंतर्गत रेशीम कोषांना उत्पादनावर आधारीत प्रोत्साहनात्मक अनुदान देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एनपीएस-१११८/प्र.क्र.६६/ रेशीम कक्ष**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक :- ३ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक: रेशीम ११०६/प्र.क्र.७३/ रेशीम कक्ष , दिनांक ८ सप्टेंबर, २०१०
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक: वस्त्रोद्योग धोरण २०१७/ प्र.क्र.६/ टेक्स-५, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८
३) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र.कार्या-८/जिवायो/कोष अनुदान/प्रस्ताव/१८-१९ /२२७ दि. २ मे, २०१८.
४) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र.कार्या-८/जिवायो/कोष अनुदान/१८-१९/१२८२ दि. २९ ऑगस्ट, २०१८.

प्रस्तावना :-

रेशीम उद्योग हा कृषी व वनसंपत्तीवर आधारीत रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. या उद्योगाच्या माध्यमातून ग्रामिण भागातील जनतेचा आर्थिक स्तर वाढविणे व शहरी भागाकडे होणारे स्थलांतरण थांबविणे शक्य आहे. समाजातील सर्व वर्गातील व वयोगटातील लोकांना रोजगाराची संधी देणारा हा एकमेव खात्रीशीर उद्योग आहे. रेशीम उद्योगाचे महत्व व रोजगार निर्मितीला असणारा वाव विचारात घेवून रेशीम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी संदर्भ क्र.२ येथील राज्याचे नविन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मध्ये अनेक उपाययोजना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने तुती रेशीम शेतीसाठी जिल्हास्तरीय योजनेतंर्गत रेशीम कोषास (सी.बी. वाणाचे कोष व बी.व्ही. वाणाचे कोष ) याकरीता उत्पादनावर आधारीत प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याचा प्रस्ताव संचालक (रेशीम) यांनी त्यांचे संदर्भाधिन क्र. ३ व ४ येथील पत्रान्वये सादर केला होता. त्यास अनुसरून तुती रेशीम शेतीसाठी जिल्हास्तरीय योजनेंतर्गत रेशीम कोषांना (सी. बी. वाणाचे कोष व बी.व्ही.वाणाचे कोष) याकरीता उत्पादनावर आधारीत प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

रेशीम विस्तार व विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील शेतक-यांनी उत्पादन केलेल्या रेशीम कोषांना प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने तुती रेशीम शेतीसाठी जिल्हास्तरीय योजनेतंर्गत रेशीम कोषांना (सी.बी.वाणाचे कोष व बी.व्ही.वाणाचे कोष ) याकरीता उत्पादनावर आधारीत प्रोत्साहनात्मक अनुदान प्रती किलो खालील नमूद तपशीलाप्रमाणे देण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे:-

| कोषाचा प्रकार | प्रती किलो अनुदानाचा दर रुपये |
|---|---|
| सी.बी. वाणाचे कोष | **३०** |
| बायोव्होलटाईन कोष | **५०** |

२. जिल्हा वार्षिक योजनेतून शेतक-यांना प्रोत्साहनात्मक अनुदान योजना राबविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे :-

१) लाभार्थी रेशीम शेतक-यांची नोंदणी ऑनलाईन माहिती प्रणालीवर (MIS) असणे बंधनकारक राहील.

२) तुती लागवडीची भूमी अभिलेखात ७/१२ उता-यावर पिकपाण्याची नोंद असणे आवश्यक राहील.

३) शेतक-यांना पुरवठा करण्यात आलेले अंडीपुंज, चॉकी अळ्या ह्या शासनमान्य संस्थेकडून घेणे आवश्यक असून त्याच्या अद्ययावत नोंदी संबंधित जिल्हा रेशीम कार्यालयांने ठेवणे बंधनकारक राहील.

४) रेशीम शेतक-यांना संगणीकृत बारकोड असलेले पासबुक देण्यात येवून त्या पासबुकमध्ये बॅचवाईज अंडीपुज/ चॉकी व त्याच्या कोष उत्पादनाची नोंद ठेवण्यात यावी.

५) या योजनेतून लाभ घेणा-या शेतक-यांनी उत्पादीत केलेले कोष राज्यातील शासकीय/ शासनमान्य कोष खरेदी-विक्री बाजारपेठेमध्ये विक्री करणे बंधनकारक राहील.

६) राज्यातच कोषाची विक्री होवून कोष प्रक्रीया उद्योग वाढीकरीता खाजगी रिलर्स व उद्योजकांसाठी कोष खरेदी विक्री बाजारपेठेची सुविधा संचालक (रेशीम) यांनी उपलब्ध करून द्यावी.

७) रेशीम शेतक-यांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी सदर अनुदान उत्पादनावर आधारीत असल्याने सरासरी १०० अंडीपुंजाला ५५ किलो कोष इतके किमान उत्पादन घेणा-या शेतक-यालाच या अनुदानाचा लाभ देय राहील.

८) सदरचे अनुदान हे डबल , डागाळ व पोचट कोषास देय राहणार नाही.

९) या योजनेचा लाभ, लाभार्थी शेतक-याने तूती लागवड केलेल्या एकूण क्षेत्रापैकी फक्त एक एकर तुती लागवडीवर उत्पादीत होणा-या राज्याच्या सरासरी कोष उत्पादनाच्या मर्यादेत राहील.

१०) परराज्यातून आवक झालेल्या व व्यापा-यांच्या कोषासाठी ही योजना लागू राहणार नाही.

११) रेशीम शेतक-यांनी कोषाची विक्री केल्यानंतर कोषाची रक्कम त्यांच्या बचत खात्यात (NEFT/ RTGS) द्वारे जमा करणे संबंधित कोष बाजारपेठेस बंधनकारक राहील. कोष विक्रीची रक्कम रोखीने अदा केल्यास सदर अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

१२) रेशीम उत्पादक शेतक-यांनी या योजनेखाली अनुदान मिळण्यासाठी कोष विक्रीची मुळ पावती, कोष विक्रीच्या जमा रकमेची नोंद असलेल्या बँक पासबुकची छायाप्रत इत्यादी समुह प्रमुखांच्यामार्फत संबंधित जिल्हा रेशीम कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

१३) रेशीम माहिती प्रणालीवर नोंदविलेले बॅचवाईज अंडीपुंज /चॉकी व उत्पादीत कोष व विक्रीच्या माहितीनुसार तसेच, पासबुकवरील नोंदीनुसार क्षेत्रीय अधिका-यांनी शेतक-यांचे अनुदानाचे प्रस्ताव तयार करावे.

१४) शेतक-यांनी प्राप्त केलेल्या कोष विक्रीच्या पावतीच्या आधारे व रेशीम माहिती प्रणालीवरील नोंदीनुसार त्यांच्या अनुदानाची रक्कम निश्चित करण्याची जबाबदारी संबधित जिल्हा रेशीम विकास अधिकारी यांची राहील.

१५) शेतक-यांचे अनुदानाचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हा रेशीम विकास अधिका-याने ते तपासून सहायक संचालक (रेशीम) यांचेकडे तांत्रिक मान्यतेकरीता सादर करावे. सहायक संचालक (रेशीम) यांनी योग्य प्रस्तावांना मंजूरी दिल्यानंतर सदरचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती यांचेकडे पाठविण्यात यावे. जिल्हाधिकारी यांनी अनुदानाचा निधी संबंधित जिल्हा रेशीम कार्यालयास वितरणासाठी उपलब्ध करून द्यावा.

१६) जिल्हा वार्षिक योजनेमध्ये उत्पादनावर आधारीत कोष अनुदानाची आवश्यक तरतूद करून घेण्याची जबाबदारी संबधित जिल्हा रेशीम अधिका-याची राहील.

१७) या योजनेतील पात्र लाभार्थ्यांना प्रोत्साहनात्मक अनुदान थेट लाभ हस्तांतरण (DBT) नुसार MAHADBT पोर्टलच्या माध्यमातून शेतक-यांच्या बचत खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.

१८) या योजनेची योग्य पध्दतीने व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी व नियंत्रण संचालक (रेशीम) यांचे राहील.

**३.** वरील अनुदान योजनेसाठी पात्र ठरणा-या शेतक-यांनी उत्पादीत केलेल्या रेशीम कोषाचा दर्जा तसेच बाजारपेठेतील कोष खरेदी-विक्री इत्यादींबाबतचे निकष निश्चित करून मार्गदर्शक सुचना क्षेत्रीय कार्यालयास देण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

**४.** सदर योजना सन २०१९-२० पासून जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ठ करण्यास नियोजन व वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार वरील योजना राबविण्यासाठी होणारा खर्च त्या त्या जिल्हयातील जिल्हा नियोजन व विकास निधीतून भागविण्यात यावा.

**५.** सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२३६/२०१९/व्यय-२, दि.२२.०७.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०३१३२४१७४५०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co Operation Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.09.03 13:42:39 +05'30'

**( आ. अ. लोपिस )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति -**

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), नागपूर
३) संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
४) सर्व विभागीय आयुक्त.
५) सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी,
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
७) नियोजन विभाग (का-१४८१), मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)
८) वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)
९) संचालक, रेशीम संचालनालय, (म. रा.), प्रशासकीय इमारत क्रमांक -२, ६ वा माळा, बी - विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१
१०) सर्व सहायक संचालक, प्रादेशीक रेशीम कार्यालय,
११) सर्व जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्रेणी १ / २, जिल्हा रेशीम कार्यालय,
१२) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद

१३) महाराष्ट्र राज्यातील सर्व संसद सदस्य
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१५) मा.राज्यपालांचे सचिव
१६) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
१७) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१८) बहुजन समाज पार्टी , डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई -४००००१
१९).भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश , सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईट, मुंबई -४०००२०.
२०). भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४ राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई
२१). भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई -४०००१३.
२२). इंडियन नॅशनल कॉग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई -४०००२१.
२३). नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई -४०००२१.
२४). शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई -४०००२८.
२५). निवड नस्ती (रेशीम कक्ष),